Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ११६ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.२३ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आपले रामलल्ला आता तंबूत राहणार नाहीत, अयोध्येत नरेंद्र मोदींच्या भावना



## आज हमारे राम आ गये

**अयोध्या :** 'आज हमारे राम आ गये' असे उद्गार काढत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मनोगतास सुरुवात केली. निमित्त होतं अयोध्येतील भव्य राम मंदिरात रामलल्ला यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं. पंतप्रधान मोदींच्या हस्ते विधिवत पूजा करुन रामलल्ला यांची प्रतिष्ठापना करण्यात आली. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्याचं भाग्य अनेक रामभक्तांना घरबसल्या मिळालं. आज आपले राम आलेत, वर्षानुवर्षांच्या प्रतीक्षेनंतर, त्याग आणि तपश्चर्येनंतर प्रभू राम आले, असे उद्गार मोदींनी काढले.

श्रीराम भक्तांची प्रतीक्षा अखेर संपली आणि डोळ्यांचे पारणे फेडणारे रामलल्लांचे मनोहारी रुप समोर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अयोध्येतील भव्य आणि ऐतिहासिक राम मंदिरात रामलल्लांची विधीवत पूजा करण्यात आली. ५०० वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर राम मंदिरात रामलल्लांची मूर्ती विराजमान झाली. पूजेवेळी रामलल्लांच्या गर्भगृहात पंतप्रधान मोदींसह सरसंघचालक मोहन भागवत, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राज्यपाल आनंदीबेन पटेल उपस्थित होते.आज हमारे राम आ गये, वर्षानुवर्षांच्या प्रतीक्षेनंतर, त्याग आणि तपश्चर्येनंतर प्रभू राम आले. माझा कंठ दाटून आला आहे, शरीरात स्पंदनं निर्माण झाली आहेत, आणि मन त्या क्षणात लीन झालं आहे. आपले रामलल्ला आता तंबूत राहणार नाहीत, दिव्य मंदिरात राहणार आहेत. माझा पक्का विश्वास आहे, अपार श्रद्धा आहे, विश्वाच्या कानाकोपऱ्यात रामभक्तांना याची अनुभूती आली असेल असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.हे क्षण अलौकिक आहेत, पवित्र आहेत, हे वातावरण, ही ऊर्जा... प्रभू श्रीरामांचा आपल्यावर आशीर्वाद आहे. पण २२ जानेवारी २०२४ चा सूर्य अद्भूत तेज घेऊन आला आहे. भूमिपूजनापासून सर्वांना उमंग जाणवत होता, अन् उत्साह वाढतच चालला होता. २२ जानेवारी २०२४ हा नव्या कालचक्राचा उगम आहे. आपल्याकडून कुठलीतरी कमतरता राहिली असेल, म्हणून इतकी वर्ष आपण राम मंदिराचा निर्माण करु शकलो नाही, परंतु आता श्रीरामाने आपल्याला माफ केलं असेल या भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केल्या.अयोध्यानगरीत भक्तांचा महासागर उसळला होता. मात्र फक्त अयोध्याच नव्हे, तर अवघा देश 'राम'मय झाला आहे. महाराष्ट्रातही राम भक्तांनी राम मंदिराच्या उद्घाटनाचा सोहळा साजरा केला.

# रामलल्ला प्राण-प्रतिष्ठा सोहळ्याने सामाजिक एकोपा वाढविला - डॉ.अशोक जीवतोडे


**चंद्रपुर । प्रतिनिधी**

श्री राम जन्म भूमी मंदिर, अयोध्या येथील रामलल्ला प्राण-प्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त देशभरात उत्सवाचे व उत्साहाचे वातावरण होते. या उत्सवात व उत्साहात विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांनी सक्रिय सहभाग घेत सिव्हील लाईन चौकात भक्तिमय वातावरण निर्माण केले. आठवडा भरापासूनच साफ स्वच्छता, राम-धून, हनुमान मंदीरात पूजापाठ आदी उपक्रमातून रामलल्ला प्राण-प्रतिष्ठा सोहळ्याचे उत्साही व धार्मिक वातावरण तयार केले. आज (दि.२२) ला विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांच्या नेतृत्वात श्री राम जन्म भूमी मंदिर, अयोध्या येथे रामलल्ला प्राण-प्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त, स्थानिक सिव्हील लाईन चौकातील पुरातन हनुमान मंदीरात दिपप्रज्वलन, पुजा, अर्चना, होम, हवन, प्रार्थना, रामधुन करण्यात आली तथा स्थानिक



सिव्हील लाईन चौकात बुंदी वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. परिसरातील या भक्तिमय वातावरणात शेकडो जनतेनी सहभाग नोंदविला व महाप्रसादाचा लाभ घेतला. १२:२० ला रामलल्ला प्राण-प्रतिष्ठा होताच फटाके फोडून जल्लोष करण्यात आला. जय श्रीरामचा एकच जयघोष परिसरात घुमू लागला. अत्यंत उत्साही व प्रसन्न वातावरणात सामाजिक एकोपा वाढवून दीपोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी बोलताना डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले की, रामलल्ला प्राण-प्रतिष्ठा सोहळ्याने सामाजिक एकोपा वाढविला आहे. मनामनात असलेला राम माणसा माणसात मर्यादा व प्रेम वृध्दिंगत करीत आहे. संपूर्ण देश आज एक होवून जगाला भक्ती व शांती अर्पण करीत असल्याचे चित्र आहे.यावेळी डॉ. अशोक जीवतोडे यांच्यासह परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते.

# 'जय श्रीराम'च्या जयघोषाने आलापल्ली नगरी दुमदुमली





**आलापल्ली । प्रतिनिधी**

अयोध्या येथे होणाऱ्या रामलल्ला प्राणप्रतिष्ठापना निमित्य आलापल्ली येथील श्रीराम मंदिर येथे पाच दिवसीय विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.त्यात २१ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास काढण्यात आलेल्या 'कलश यात्रेने ' सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.यावेळी महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग होत जय श्रीराम च्या जयघोषात संपूर्ण परिसर दणाणून सोडला. आलापल्ली येथे श्रीराम मंदिर कमिटी, श्रीराम जन्मोत्सव कमिटी द्वारा १७ जानेवारी ते २२ जानेवारी पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.यात श्रीराम नामजप यज्ञ, हनुमान चालीसा पठण, राम रक्षा पठण, आरती, गरबा नृत्य,कलश यात्रा आदी कार्यक्रम घेऊन २२ जानेवारी रोजी श्रीराम अभिषेक पूजा त्यानंतर गतपाच शतकापासून रामभक्त ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते तो क्षण म्हणजे बहुप्रतीक्षित राम मंदिर प्रतिष्ठापना सोहळा. या सोहळ्याचे याठिकाणी थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले तर दिवसा आणि रात्री या ठिकाणी विविध कार्यक्रम घेण्यात आले. माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांची उपस्थिती आलापल्ली येथील श्रीराम मंदिर परिसरातून मुख्य चौकात काढण्यात आलेल्या कलश यात्रेत माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांनी उपस्थित राहून कलश यात्रेत सहभागी झाले.यावेळी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद बघायला मिळाला.

# भूमिपूजन सोहळा थाटात संपन्न



**वर्धा । प्रतिनिधी**

दिनांक २२/जानेवारी रोज सोमवारला अॅग्रीसन फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लि. आर्वी छोटी तालुका हिंगणघाट, जिल्हा वर्धा चा भूमिपूजन सोहळाआर्वी छोटी येथील प्रकल्प स्थळी पार पडला.यावेळी उद्घाटक म्हणून माजी आमदार ॲड वामनराव चटप, अध्यक्षस्थानी माजी आमदार सरोज काशीकर, प्रमुख पाहुणे म्हणून तालुका कृषी अधिकारी सचिन सुतार, स्मार्टचे अर्थशास्त्रज्ञ तथा पुरवठा व मुल्य साखळी तज्ज्ञ हेमचंद गुप्ता, बिटीएम अरविंद देवतळे तसेच कंपनी संचालक अनिलकुमार जवादे, कृष्णराव देशट्टीवार, गंगाधर मुटे, गोपाल रायपुरे, उषा दरणे, सुर्यासन एफपीसीएलचे सचिन कांबळे, कंत्राटदार संपन कटरे आणि मोठ्या प्रमाणात कंपनी सभासद उपस्थित होते.भूमिपूजना नंतर संपन्न झालेल्या सभेत गंगाधर मुटे यांनी कंपनीच्या कामकाजाचा आणि वाटचालीचा संक्षिप्त आढावा घेतला. याप्रसंगी व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करून कंपनीच्या पुढील वाटचालीस सदिच्छा व्यक्त करून भरीव सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# सुरेश बँड पार्टीचे रामलला अनोखे वंदन



**पुलगाव । प्रतिनिधी**

देशात सर्वत्र राममय वातावरण असताना बँड पथक कुठे मागे राहणार. पुलगाव शहरातील सुरेश बँड पथकाने आपल्या दुकानासमोर दोन भव्य रामाच्या प्रतिमा लावल्या.परिसरातील दुकानदार मित्रांना गोळा केले. श्री राम प्रभुचे पुजन व आरती केली. श्रीराम आरती,भजने,भक्तीगीते बॅण्डवर वाजवून प्रभु रामाला वंदन केले. श्रीरामजन्मभूमी अयोध्या येथील श्री रामललाचा प्राणप्रतिष्ठा होत असलेल्या सोहळ्याचा आनंद सर्वत्र व्यक्त केल्या जात आहे. प्रत्येक जण आपल्या विशेष पद्धतीने भावना व्यक्त करत आहेत. सुरेश बँड पथकाने केलेले असेही श्रीराम वंदन!




# कोण आलारे,कोण आला? महाराष्ट्राचा वाघ आला!

**बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी व व्यंगचित्रकार होते. सामना या मराठी दैनिकाचे ते संस्थापक तथा मुख्य संपादकही होते. त्यांची हिंदुहृदय सम्राट म्हणूनही लोकांच्या हृदयांवर छाप उमटली आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा त्यांच्या आठवणी जागविणारा माहितीपूर्ण लेख...संपादक**

बाळासाहेबांनी दि.१९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली. त्यांच्या मते समाज सुधारकांची समृद्ध परंपरा असलेला महाराष्ट्र पुरोगामी आहे, परंतु मराठी माणूस मागेच राहिला. महाराष्ट्रात सुविधा आहेत, मात्र मराठी माणूस दुविधेतच. महाराष्ट्रात उद्योग आहेत, पण मराठी तरुण बेरोजगार! तर महाराष्ट्रात पैसा आहे, परंतु मराठी माणूस गरीब आहे. महाराष्ट्राला भारतात मान आहे, मात्र मराठी माणूस महाराष्ट्रातच प्रामुख्याने मुंबईत अपमानित होत आहे. शिवसेनेचा पहिला मेळावा याच वर्षी ३० ऑक्टोबरला शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. ज्यात लाखो लोकांचा सहभाग होता. या मेळाव्यापासूनच त्यांची आणि शिवतीर्थावरील- शिवाजी पार्कवरील मराठी माणसांची गर्दी यांच्यामध्ये नातेसंबंध प्रस्थापित होण्यास सुरुवात झाली. त्यांनी सर्वप्रथम एक व्यंगचित्रकार म्हणून सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. इ.स.१९५०मध्ये ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. पुढील काळात त्यांनी ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर.के.लक्ष्मण यांच्यासमवेतही काही काळ काम केले. फ्री प्रेस जर्नलमध्ये काम करीत असतानाच ते विविध संस्था, कंपन्या व नियतकालिके यांसाठी चित्रे, व्यंगचित्रे, जाहिरातीचे डिझाइन अशी कामे करीत असत. त्यांच्या व्यंगचित्रात इंदिरा गांधींची व्यक्तिरेखा आवडती होती.

बाळासाहेबांचा जन्म महाराष्ट्र राज्यातील मराठी विद्या व संस्कृती यांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात दि.२३ जानेवारी १९२६ रोजी झाला. हिंदूंच्या पूजापाठ व अंधश्रद्धावर कडाडून प्रहार करणारे प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे त्यांचे वडील आणि रमाबाई या त्यांच्या प्रेमळ मातोश्री होत. महाराष्ट्राचे सांप्रत मुख्यमंत्री मा.उद्धवजी ठाकरे हे त्यांचे सुपुत्र तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.राजजी ठाकरे हे त्यांचे पुतणे आहेत. महाराष्ट्रातील राजकारणात बाळासाहेबांचा प्रचंड दबदबा निर्माण झाला होता. झुणका भाकर केंद्रांची योजना, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बेचे मुंबई नामकरण अशा अनेक योजना-प्रकल्पांची मूळ संकल्पना ही त्यांचीच होती. व्हॅलेंटाईन डेसारख्या पाश्चिमात्य उत्सवांना विरोध, परप्रांतीयांच्या तसेच बांगलादेशींच्या विरोधातील आंदोलने यांमागचा विचारही त्यांचा होता. त्यामुळेच त्यांना महाराष्ट्राचा वाघ असे संबोधले जात होते. आज त्यांच्या जयंतीच्या मंगल प्रसंगी समस्त कार्यकर्ते व शिवसैनिक कोण आला रे, कोण आला? महाराष्ट्राचा वाघ आला! अशा आरोळ्या ठोकत त्यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होतात. बाळासाहेबांनी नोकरी सोडून स्वतःचे व्यंगचित्रात्मक साप्ताहिक



काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार त्यांनी ऑगस्ट १९६० मध्ये मार्मिक हे साप्ताहिक सुरू केले. साप्ताहिकास मार्मिक हे नाव त्यांना वडील प्रबोधनकारांनीच सुचविले होते. मराठीतील हे पहिले व्यंगचित्र साप्ताहिक ठरले. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र स्थापन झालेला असतानाही प्रामुख्याने मुंबईत मराठी माणसावर अन्याय होत होता. या प्रश्नाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रात येऊन मराठी माणसाबद्दल अनादर बाळगणाऱ्यांना त्यांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून टीका केली. इ.स.१९६०पासून ते राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्य स्तरावरील प्रत्येक महत्त्वाच्या घडामोडीत, तसेच इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर मराठी लोकांना मार्गदर्शन करत. ते श्याम या बालपाक्षिकाचे सुद्धा संपादक होते. वक्तृत्वाबरोबरच ठाकरे भेदक लेखन देखील करत. प्रबोधनकार केशव ठाकरे व प्रल्हाद केशव अत्रे यांचा प्रभाव त्यांच्या लेखनात जाणवतो. शिवाय व्यंगचित्रकाराची वेधक-वेचक निरीक्षणदृष्टीही त्यांच्यामध्ये होती. सामना हे केवळ शिवसेनेचे मुखपत्र आहे, ज्यात संपादक म्हणून बाळासाहेबांचे अग्रलेख असत.बाळ ठाकरे हे हिंदुत्ववादी होते.

बाँबस्फोट, देशविघातक कृत्ये घडवणाऱ्या धर्मांधांना या देशात राहण्याचा अधिकार नाही. मतपेटीचे राजकारण करत अशा मुस्लिमांचे लांगुलचालन कोणी करू नये. भारताला आपला देश मानणाऱ्या राष्ट्रवादी मुस्लिम लोकांना आपला कोणत्याही प्रकारचा विरोध नाही, असे विचार त्यांनी मांडले. हिंदुत्ववादी भूमिकेमुळे त्यांना शिवसैनिकांनी हिंदुहृदय सम्राट अशी पदवी दिली. त्यांनी दिलेली गर्व से कहो, हम हिन्दु है, ही घोषणाही त्यांच्या राजकारणाचा महत्त्वाचा भाग होती.बाळासाहेब ठाकरे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन दि.१७ नोव्हेंबर २०१२ रोजी मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी त्यांनी चिरनिद्रा घेतली. त्यांच्या पश्चात बरोबर दहा वर्षांनी एकसंध प्रबळ शिवसेनेचे दोन गट पडले आहेत. हे बघून त्यांच्या आत्म्याला असह्य वेदना झाल्या नसतील कशावरून? !! बाळासाहेब ठाकरेजींना त्यांच्या जयंती सप्ताह निमित्त कोटी कोटी विनम्र अभिवादन !!



श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
मु.पो.ता.जि.गडचिरोली
फक्त व्हॉ.नं.९४२३७१४८८३.


# देऊळगाव गात येथे पशु आरोग्य शिबिर



**सेलू । प्रतिनिधी**

सेलू तालुक्यातील देऊळगाव गात येथे काल पशु आरोग्य शिबिर घेण्यात आले. कै शंकर बापू आप्पा स्वामी यांच्या स्मरणार्थ हे शिबिर घेण्यात आले .यावेळी देऊळगाव गात येथील पशुपालकांनी आपल्या पाल्यास लाळ खुरखुत वाताचे ऑपरेशन. खच्चीकरण. कुत्र्याचे खच्चीकरण. गर्भ तपासणी. ६ ०० पशु चे लाळ खुरकूत लसीकरण करण्यात आले .याप्रसंगी तंटामुक्तीचे अध्यक्ष त्रिंबक कदम. माजी पंचायत समिती सदस्य गोपाळ कदम .राजेभाऊ कदम .वैद्यकीय विद्यालयाचे डॉ चेपटे .डॉ गळाकुटू .डॉ रामाने. सय्यद मोहसिन. डॉ. राठोड. विस्तार अधिकारी डॉ प्राजक्ता कुलकर्णी. सोमनाथ गाडीलोहार. अनिल स्वामी. माऊली कदम. रवी वरकर . रमेश गायकवाड. माऊली बाराहाते गोविंद काकडे आप्पासाहेब माने. परिसरातील पशुपालकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. शिबिराचा लाभ घेतला.

# बोहरा समाजाने केले उसळ वाटप



**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील रॉयल कॉम्प्लेक्स मध्ये व्यवसाय करणाऱ्या बोहरा बंधुनी व परिसरात राहणाऱ्या व्यापारांनी श्री रामजन्मभूमी अयोध्या श्री रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त साबुदाणा खिचडीचे वाटप केले.यामध्ये अश्विन शाह,अलीअसगर सैफी,संजू शाह,बंटू शाह,मुस्तफा बोहरा,हकीमुद्दीन बोहरा,घनश्याम सुरसे,हेमंत तलवाड़े,नजमुद्दीन बोहरा,फजल बोहरा,अब्दुल बोहरा यांनी विशेष सहकार्य केले. त्याचप्रमाणे शुभेच्छा बॅनर पण लावले.

# जि.प.प्रा.शाळा निवळी खुर्द येथे भित्तीपत्रकांचे विमोचन

**जिंतूर । प्रतिनिधी**

दि. १७/०१/२०२४ रोजी बोरी पासून जवळच असलेल्या निवळी खुर्द शाळेत मंगळवारी बालसभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी इयत्ता सहावी, सातवी व आठवी च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या उत्कृष्ट भित्तीपत्र कांचे विमोचन शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक श्री. डी.जी. चौधरी यांनी फीत कापून केले. बाल सभेच्या अध्यक्ष स्थानी शाळेतील इयत्ता सहावीचा विद्यार्थी रत्नदिप गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून ओंकार राऊत, युवराज ठोंबरे, ईश्वर ठोंबरे आप्पाराव ठोंबरे वैष्णवी वाघ हे होते. यावेळी मुख्याध्यापक डी. जी चौधरी यांनी तसेच शाळेतील शिक्षक संतोष बारबिंडे यांनी बालसभा आयोजन तसेच भित्तीपत्र कांबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करताना सर्वांनी विविध शालेय उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. सुत्रसंचालन सायली ठोंबरे हिने केले. यावेळी मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या हस्ते मकर



संक्रांती निमित्त विद्यार्थांना तीळगूळ वाटप करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक संतोष बारबिंडे, सोनाली पटवे, ज्योत्स्ना बोनलेवाड व शिक्षकेतर कर्मचारी यांनी बहुमोल परिश्रम घेतले.

# ॲड.सुनिल जाधव यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस लिगल सेलच्या जिल्हाध्यक्षपदी निवड





**मानवत । प्रतिनिधी**

मानवत येथील प्रसिध्द विधितज्ञ ॲड, सुनिल जाधव यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (लिगल सेल) च्या परभणी जिल्हा अध्यक्षपदी दिनांक ०१/०१/२०२४ पासून नियुक्ती पक्षाच्या वतीने करण्यात आली असून राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष बळकटीसाठी व मजबुत करण्यासाठी तसेच पक्षाची ध्येय धोरणे व आदरणीय श्री शरदचंद्रजी पवार साहेब यांचे विचार परभणी जिल्हयातील सर्व वकील बंधु व भगिनी तसेच सर्व सामान्य जनते पर्यंत पोहचविण्यासाठी आपले सहकार्य राहील असा मला विश्वास आहे.निवडी बद्दल प्रदेशाध्यक्ष आशिष पंजाबराव देशमूख यांनी अभिनंदन केले आहे.तर आज मानवत येथे वकिल संघाच्या वतीने ॲड बळीरामजी शिंदे, ॲड, यशपाल पंडित, ॲड श्याम कूर्हाडे ॲड, संजयकूमार हाजारे यांनी वकील संघाच्या सभागृहात ॲड, सुनिल जाधव यांचा सत्कार करून पूढील कार्यास शूभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांनी ज्ञानार्थी व्हावे-प्रा.डॉ.डी.एन.मोरे

**सोनपेठ । प्रतिनिधी**

सोनपेठ येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने आयोजित गेस्ट लेक्चर मध्ये प्रा.डॉ.डी.एन.मोरे बोलत होते. पीपल्स महाविद्यालय नांदेड इंग्रजी विभाग प्रमुख तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ.डी.एन.मोरे यांचे गेस्ट लेक्चर आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ.मोरे सरांनी भाषा, वाङ्मय आणि नवीन शैक्षणिक धोरण २० २० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी अध्ययन अध्यापन प्रक्रियेचा भाग झाले पाहिजे असे प्रतिपादन केले. त्याचबरोबर विद्यार्थी हा केवळ परीक्षार्थी न बनता तो ज्ञानार्थी बनला पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी केले. यामध्ये इंग्रजी विषयातील विविध




संधी या संदर्भाने डॉ.जायभाये यांनी सुद्धा आपले मत मांडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मोरे सर विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य झाल्यामुळे त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डी.बी.कोरडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन बी.ए.द्वितीय वर्षाचा विद्यार्थी रवी राठोड ने केले. याप्रसंगी इंग्रजी विभागासह अन्य विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वक्तृत्व शैलीने व्यक्तिमत्व बहरते-गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले

**जिंतूर । प्रतिनिधी**

दि १६/०१/२०२४ रोजी जिंतूर तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय जिंतूर येथे करण्यात आले.आयोजित केलेल्या भव्य तालुकास्तरीय स्पर्धेचे प्रास्ताविक करताना गटशिक्षणाधिकारी त्रंबक पोले बोलत होते. ०१ जानेवारी २०२४ पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सन्माननीय मुख्यमंत्री महोदय यांचे महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान सुरू झाले आहे. या अभियानातील विविध उपक्रमातील एक भाग असणारी वक्तृत्व व निबंध स्पर्धा तालुकास्तरावर उच्च प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटात आयोजित केली आहे.प्रत्येक व्यक्तीच्या अभिव्यक्ती कौशल्याला वाव देणाऱ्या या दोन्ही स्पर्धा आहेत. आपल्या मनातील विचार, भावना यांची शैलीबद्ध पद्धतीने मांडणी करून ऐकणाऱ्या श्रोत्यांना प्रभावित करणे म्हणजे वक्तृत्व. वक्तृत्व कलेमुळे माणसाचे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने बहरते. निबंध स्पर्धेत भाग घेताना व स्पर्धेतील विषयावर लिहिताना आपल्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो. आपली विचार करण्याच्या प्रक्रियेला चालना मिळते. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होतो यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.वक्तृत्व स्पर्धेसाठी वक्तृत्व कलेत तज्ञ असणारे विनोद पाचपिल्ले, कल्याण भोसले हे परीक्षक होते. तर निबंध स्पर्धेसाठी या तज्ञ असणारे शिवाजी वाघ, जयश्री लहाने, भगस हे परीक्षक होते.वक्तृत्व स्पर्धेत माध्यमिक गटात शिल्पा दिलीप चव्हाण हिने प्रथम तर ऋतुजा गजानन नागरे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. उच्च प्राथमिक गटात वेदिका गोविंद पितळे, श्रावणी हनुमान गरड यांनी विभागून प्रथम, भक्ती नारायणराव खापरे हीने द्वितीय, गायत्री माधवराव कुकडे हिने तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेमध्ये स्वरा गोविंद कांदे या इयत्ता चौथीत शिकणाऱ्या चिमुकलीने उस्फूर्तपणे वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. याबद्दल या बाल चिमुकलीचा गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांनी गौरव केला. निबंध स्पर्धेचा निकाल प्रक्रियेमध्ये आहे.या भव्य तालुकास्तरीय स्पर्धांचे सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानोबा साबळे व मंगेश नरवाडे, केंद्रप्रमुख मारोती घुगे, पांडुरंग भांबळे, शंकर चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैजनाथ प्रधान, डी जी पोले, रामेश्वर कांदे, मनीष सावळे, रवी मुंडे, सुरेश सोळंके, प्रभाकर नालंदे, सचिन चव्हाण, योगेश देशमुख, योगिता संगवई, रत्नमाला तोडकर यांनी मेहनत घेतली.



# मी म्हटलो होतो ना त्या कारसेवकांमध्ये होतो म्हणून देवेंद्र फडणवीसांनी शेअर केला कार सेवेचा फोटो

**मुंबई**–उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये बाबरी मशीद पतनाच्या श्रेयवादावरून अनेकदा आरोप-प्रत्यारोप रंगले आहेत. फडणवीस यांनी कारसेवा केली होती, या दाव्याची ठाकरे गटाने खिल्ली उडवली होती. मात्र आता फडणवीस यांनी कार सेवा करतानाचा फोटो शेअर केला आहे.राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपणही कारसेवक होतो आणि अयोध्येला कारसेवेसाठी गेलो होतो, असे त्यांनी अनेकदा सांगितले आहे. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी एक फोटो शेअर करत कारसेवेला गेल्याचा पुरावाच दिला आहे.राम मंदिर आंदोलनाच्या वेळी देशभरातून कारसेवकांची लाट उसळली होती. लाखो तरुण त्यावेळी अयोध्येत राम मंदिर उभारण्यासाठी त्या दिशेने निघाले होते. त्यावेळची ही आठवण आहे. अयोध्येला जाणार्या कारसेवकांची नागपूर रेल्वे स्थानकावर गर्दी उसळली होती. त्या गर्दीचा हा फोटो आहे. या फोटोमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिसत आहे.एक काळ असा होता प्रभू श्रीरामांचे मंदिर ध्वस्त होऊन बाबरीचा ढाचा तयार झाला होता. अनेक हिंदू राजे, रजवाडे हे मुघलांचे मनसदरबार म्हणून काम करत होते. त्यावेळी आपण गुलामगिरीत गेलो होतो. त्या काळात आई जिजाऊंनी छत्रपती शिवरायांना स्वराज्य ही संकल्पना समजावून सांगितली. शिवबा तुला अन्यायाविरोधात उभे रहावे लागेल, रयतेला गुलामगिरीतून सोडवावे लागेल हा मूलमंत्र आई जिजाऊंनी शिवबांना दिला असे देवेंद्र फडणवीस आपल्या भाषणात म्हणाले. तर बाळासाहेब ठाकरे वाघ होते, त्यांनी राम मंदिराच्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. मात्र बाबरी मशिद पडली तेव्हा उद्धव ठाकरे आणि त्यांचे चेले चपाटे कुठे होते? असा खोचक प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी विचारला आहे.जुनी आठवण... नागपूरहून प्रकाशित होणार्या 'दै. नवभारत'ने मला हे छायाचित्र आवर्जून पाठविले. अयोध्येला जाणार्या कारसेवकांची नागपूर रेल्वे स्थानकावर गर्दी उसळली, तेव्हाचे हे छायाचित्र. छायाचित्रकार शंकर महाकाळकर यांनी ते टिपले आहे. उद्या (२२ जानेवारी) अयोध्येत प्रभूश्रीरामचंद्रांची प्राणप्रतिष्ठा होत असताना या छायाचित्राच्या माध्यमातून जुन्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा मिळाला आहे... नवभारत परिवाराचा मी अतिशय आभारी आहे.मुळात कारसेवा हा शब्द मराठी किंवा हिंदी नाही. हा शब्द मूळ संस्कृत भाषेतून आला आहे. कार हा शब्द कर म्हणजेच हात या अर्थाने आहे आणि सेवा किंवा सेवक हे शब्द त्याला जोडून आले आहेत. निस्वार्थपणे सेवा करणारा म्हणजे कारसेवक, असा त्याचा अर्थ आहे.



# शरद पवारांची अदृश्य शक्तीकडून बदनामी सुरू:राजकारण करा पण असे नका–सुळे


**पुणे**–माझे वडील फार कमी बोलतात. ते कुणाला सल्ला तर देतच नाहीत. आता माझ्या वडिलांच्या मागे त्यांची बदनामी करायला अदृश्य शक्ती लागली आहे. राजकारण जरूर करा पण असे करू नको. रोहित पवारांनाना ईडीची नोटीस आली. आता त्याने तुमच्या आयुष्यात काय फरक पडतो?, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केले आहे.सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की,राज्यातले प्रश्न आम्ही संसदेत मांडतो. आज लोकशाही नाही तर संसदेत दडपशाही सुरू आहे. त्यांचे ३८ खासदार भीतीपोटी काहीच बोलत नाहीत. नितीन गडकरी साहेबांचे आभार मानते. कारण त्यांनी बारामती लोकसभा मतदार संघात खूप कामे केली आहेत. आज ६ वंदे भारत रेल्वे जातात त्याचा उपयोग माझ्या मतदार संघाला शून्य फायदा आहे.



सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मला तुम्ही ३ वेळा मतदान करून दिल्लीला जायची संधी दिली. मी तुमची लोकप्रतिनिधी म्हणून दिल्लीत जाते. राज्यातून ४८ खासदार दिल्लीत जातात. ३८ सत्तेत आहेत तर १० विरोधात आहेत. १८ वर्षात पहिल्यादा माझे निलंबन झाले. कारण मी शेतकरी बांधवांच्या मालाला भाव मिळावा ही मागणी केली. मी काही नियम मोडले नाहीत. कुठलीही घोषणाबाजी केली नाही. तरी मला निलंबित केले.कामासाठी, लोकांसाठी आवाज उठवला आणि निलंबन केले तर मी १०० वेळा निलंबित व्हायला तयार आहे.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, पुण्यात ५ वर्ष भाजपची सत्ता होती. २ वर्ष झाली आपल्याला नगरसेवक नाहीये हे दुर्दैव आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत तुमचे सरकार आहे. मग आमचा काय विकास झाला आहे? स्मार्ट सिटी फक्त सांगितली गेली. पत्यामुळे तुमच्या-आमच्या आयुष्यात काय बदल झाला? का असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला आहे.

# ईडी-इन्कमटॅक्स स्वतंत्र यंत्रणा:राज्य सरकारला वाटले अन् कारवाई झाली असे होत नाही - शंभुराज देसाई

**मुंबई**–ईडी आणि इन्कमटॅक्स हे स्वतंत्र विभाग आहेत. त्यांना त्यांचे अधिकार आहेत. त्यात राजकीय आणि शासकीय हस्तक्षेप नसतो. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याबद्दल बोलण्याएवढा मी मोठा नाही. न्यायालयाचे दरवाजे सर्वांसाठी खुले असतात. न्यायालय योग्य पद्धतीने दखल घेऊन न्याय देईल, असे मत उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांनी व्यक्त केले.ईडीच्या कारवाईवरून ज्येष्ठ नेते खासदार पवार यांनी न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. त्या प्रश्नावर बोलताना मंत्री देसाई म्हणाले, ईडी आणि इन्कमटॅक्स या स्वतंत्र यंत्रणा आहेत. त्यांना त्यांचे अधिकार आहेत. राज्य सरकारला आज वाटले आणि उद्या कारवाई केली असे होत नाही.ईडीकडे काही तक्रारी प्राप्त झाल्यास त्या तक्रारीची त्यांच्याकडून अगोदर स्वतंत्र चौकशी त्यांच्या सोर्समार्फत केली जाते. त्यातून आवश्यकता वाटली, तर ज्यांच्याविरोधी तक्रार आली असेल



त्यांना समन्स देऊन चौकशीला बोलविले जाते. संबंधितांना म्हणणे मांडण्यास संधी दिली जाते. यानंतर त्या तक्रारीत त्या यंत्रणेला तथ्य वाटले, तर ते त्यांच्या अधिकाराप्रमाणे कारवाई करतात.सरकारला वाटले एखाद्यावर कारवाई करावी, तर ते तसे होत नाही. त्याची प्रोसिजर आहे. त्यामुळे ज्यांना अटक होतात, चौकशीला समन्स दिले जातात त्याची माहिती राज्य सरकारला दिली जाते. मी गृहराज्यमंत्री होतो. त्यामुळे मला माहिती आहे. त्यामुळे राजकीय हस्तक्षेपाने काहीतरी उद्देश ठेवून कारवाई केली जात नाही.

# मोदींच्या नेतृत्वात रामराज्याची स्थापना

## २२ तारखेनंतर देशात रामराज्याची संकल्पना अस्तित्वात येणार–देवेंद्र फडणवीस



**नागपूर**–२२ जानेवारीनंतर देशात रामराज्याची स्थापना करायची आहे. तसेच, मोदींच्या नेतृत्वात देशात आगामी काळात रामराज्याची संकल्पना अस्तित्वात येणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपुरात बोलतांना म्हणाले. यावेळी फडणवीसांच्या हस्ते वाल्मिकींची आरती करण्यात आली.समाजातील शेवटच्या व्यक्तीचा आवाज हा पहिल्या पंक्तीत बसलेल्या व्यक्तीच्या आवाजाइतकाच महत्त्वाचा असणे म्हणजे रामराज्य होय. सर्वांना समान न्याय, सर्वांना समान संधी आणि सर्वसामान्यांचं राज्य म्हणजे रामराज्य अशी रामराज्याची संकल्पनाही फडणवीसांनी सांगितली.पुढे बोलतांना फडणवीस म्हणाले की, वाल्मिकींची आरती करणे हे अतिशय महत्त्वपूर्ण आहे. हा मान मला मिळाला, त्याबद्दल मी अनुसुचित जाती मोर्चाचं अभिनंदन करतो. खऱ्या अर्थाने प्रभू श्रीरामांना वाल्मिक ऋषींनीच जनसामान्यांपर्यंत पोहचवण्याचं काम केलं, असेही फडवणवीस म्हणालेत.आपल्या देशाला बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून समतेचं राज्य स्थापन करण्याची संधी दिली. आता त्याच संकल्पनेवर मोदी सरकार रामराज्याची स्थापना करणार आहे. मोदींच्या नेतृत्वात येत्या काळात रामराज्याची संकल्पना देशात अस्तित्वात येणार असून त्याची सुरुवात २२ तारखेपासून होणार असल्याचे फडणवीसांनी सांगितले आहे. मोदींच्या हस्ते रामलल्लाची प्राण प्रतिष्ठा होणार आहे आणि तेव्हापासून मंदिर सर्वांसाठी खुलं केलं जाणार आहे. त्यानंतर देशात रामराज्याची स्थापना होणार आहे.आज या भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी दुर्जन शक्ती, दहशतवाद माजवणाऱ्यांचा नायनाट करत आहेत. आवश्यकता पडल्यास सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईकही केले जातात आणि ३७० कलम हटवून दुर्जन शक्तींना सांगितलं जातं की, भारताचे तुकडे तुम्हाला करु देणार नाही. रामराज्याच्या संकल्पनेवरच देशाचा कारभार सुरु आहे, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# ठाकरेंमध्ये हिंदू विरोधकांचा निषेध करण्याची हिंमत नाही महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

**अहमदनगर**–देशात हिंदू धर्माबद्दल उपशब्द काढणाऱ्यांना कोण शेजारी बसवत आहे?, हे जनतेनं ओळखलं पाहिजे. जे हिंदू धर्माच्या विरोधात बोलतात, त्यांचा निषेध करण्याची हिंमत उद्धव ठाकरे दाखवू शकत नसल्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ठाकरेंसह मविआच्या नेत्यांवर टीका केली आहे.विखे पाटील म्हणाले- हिंदूंच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करण्याची भूमिका आज देशामध्ये जाणीवपूर्वक सुरू आहे. मात्र, दुसरीकडे अयोध्येत राम मंदिराबरोबरच मशीदीची उभारणीही पंतप्रधान नरेंद्र मोदी करू शकतात.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्येमधील श्रीराम मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यानिमित्ताने मंदिर स्वच्छतेच्या केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मंत्री विखे पाटील यांनी कार्यकर्त्यांसह संगमनेर बसस्थानकाजवळील श्री दत्त मंदिरात स्वच्छता अभियान राबविले. स्वच्छता कामगारांशीही त्यांनी संवाद साधून पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांना मार्गदर्शन केले. ज्येष्ठ कार्यकर्ते आणि कारसेवेत सहभागी



झालेले उत्तमराव कर्पे यांचा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.विखे पाटील म्हणाले की, अयोध्येमध्ये उभे राहत असलेले प्रभू श्रीरामांचे मंदिर हे केवळ भक्ती आणि शक्तीचे केंद्र नाही. प्रचंड उर्जा, त्याग आणि दृढनिश्चयाच्या प्रतिकाबरोबरच हिंदू अस्मितेचा स्त्रोत बनणार आहे. या ऐतिहासिक क्षणाचा आनंद व्दिगुणित करण्यासाठी गावोगावी आनंदोत्सव साजरा करावा. अयोध्येमध्ये भक्तिमय वातावरणात असलेला मंदिर लोकार्पण सोहळा प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानाचा क्षण आहे.भारत देश आता राममय झाला असून, रामलल्लाच्या स्वागतासाठी देश सज्ज झाला आहे. या ऐतिहासिक क्षणामुळे लाखो हिंदूंचे स्वप्न पूर्ण होत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातील आणि भारताच्या इतिहासातील एक सुवर्ण पर्व ठरणार आहे. एकीकडे देश आज मोदींच्या नेतृत्वाखाली विश्वगुरु बनण्याच्या संकल्पावर यशस्वीपणे वाटचाल करत आहे. जगातील तिसरी मजबूत अर्थव्यवस्था म्हणून भारत देशाची ओळख आता जगामध्ये निर्माण होत आहे.याच ऐतिहासिक पर्वामध्ये श्रीराम मंदिराचे लोकार्पण ही देशवासीयांच्या दृष्टीने मोठी ऐतिहासिक घटना घडत आहे. या आनंदात सर्वांनीच सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. एकीकडे राम मंदिर निर्माणाचा आनंदोत्सव साजरा होत असताना दुसरीकडे या कार्यक्रमाचे निमंत्रण नाकारून काँग्रेस पक्षाने लाखो रामभक्तांचा अपमान केला आहे, अशी टीकाही त्यांनी केली.यावेळी मंत्री विखे पाटील यांनी शहरातील पंजाबी कॉलनीतील मंदिरात जाऊन प्रभू श्रीरामांचे दर्शन घेतले, तसेच शहरातील छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या पुतळ्यासही अभिवादन केले.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या उत्तरपुणे जिल्हा अध्यक्षपदी संजोग काळदंते यांची नियुक्ती

**जुन्नर**–शुक्रवार दि. १९ जानेवारी २०२४ रोजी जुन्नर तालुका महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची सर्वसाधारण सभा शिक्षणमहर्षी स्वर्गीय विलासराव तांबे यांनी स्थापन केलेल्या शरदचंद्र पवार फार्मसी महाविद्यालयातील सेमिनार हॉल मध्ये आयोजित करण्यात आली होती यावेळी डॉ आरोटे उपस्थित पत्रकारांना संबोधित करीत होते.यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उपस्थित पत्रकारांना स्वीट बॉक्स देऊन हार्दिक शुभेच्छा दिल्या.यावेळी आद्यपत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन साजरा करताना बाळशास्त्री जांभेकर व स्वर्गीय विलासराव तांबे यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले यावेळी पत्रकारांनी आपली मनोगत व्यक्त केली याशिवाय फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य दामा सर यांनी देखील सर्व उपस्थित पत्रकारांना कलम व डायरी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.यावेळी अध्यक्षस्थानी डॉ.विश्वासराव आरोटे होते यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख सुभाष डोके,पुणे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र भोर, पुणे जिल्हा संपर्कप्रमुख अशोक डेरे,जुन्नर तालुका प्रभारी अध्यक्ष भरत




अस्वार,माजी अध्यक्ष राजेश डोके,तालुका संपर्कप्रमुख रवी गजे, कैलास बोडके,नयन डुंबरे, मनोज तांबे,दिपक मंडलिक मयूर ढोबळे,तुषार चिखले,शौकत शेख,फय्याज इनामदार या पत्रकार सोबत दैनिक समर्थ गावकरीचे व्यवस्थापक संजय फुलसुंदर,प्राचार्य दामा सर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या उत्तर पुणे जिल्हा अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार संजोग काळदंते यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.स्वर्गीय विलासराव तांबे यांनी स्थापन केलेल्या शरदचंद्रजी पवार फार्मसी महाविद्यालय डुंबरवाडी येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही निवड करण्यात आली.वार्षिक सभेतील सर्व विषयांना मंजुरी देत ही सभा खेळी- मेळीत पार पडली. यामध्ये संघाच्या उत्तर पुणे जिल्हा अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार संजोग काळदंते यांची बिनविरोध निवड करण्यात आली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र भोर यांनी तर आभार पुणे जिल्हा संपर्कप्रमुख अशोक डेरे यांनी मानले.

# ताडोबात जटायुच्या अधिवासामुळे पर्यावरणाचे संरक्षण

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते जटायु संवर्धन प्रकल्पाचे उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प वाघासाठी प्रसिद्ध असलेले संरक्षित क्षेत्र आहे. वाघांच्या या भुमीत आता जटायु पक्षाचे संवर्धन होणार आहे. जैवविविधता संवर्धनातील ही अतिशय महत्वाची बाब आहे. विशेष म्हणजे नामशेष होण्याच्या मार्गावर असणाऱ्या जटायु पक्षाच्या ताडोबातील अधिवासामुळे निसर्गाची श्रृंखला पुर्नस्थापित होण्यास मदत होईल, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांच्या हस्ते कोळसा वन परिक्षेत्रातील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले.





महाराष्ट्र वन विभाग व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बोटेझरी जटायु संवर्धन राज्यस्तरीय प्रकल्पाचे उद्धाटन करतांना वनमंत्री श्री. मुनगंटीवार बोलत होते. यावेळी येथे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष प्रविणसिंह परदेशी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता, वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे संचालक किशोर रिठे, उपसंचालक नंदकिशोर काळे, सरपंच माधुरी वेलादे आदी उपस्थित होते.रामायणामध्ये जटायु पक्षाचे अनन्यसाधारण महत्व आहे, असे सांगून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, २२ जानेवारी रोजी अयोध्या येथे प्रभु रामाच्या प्राणप्रतिष्ठेचे औचित्य साधून ताडोबा येथे राज्यातील जटायु संवर्धनाचा महत्वाचा प्रकल्प साकारण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात पांढरी पाठ असणारे १० जटायु पक्षी देण्यात आले असून यापुढेही ताडोबात टप्प्याटप्प्याने जटायु येणार आहेत. पुढे ते म्हणाले, प्राणवायु देणारे वन अतिशय महत्वाचे आहे. आज अर्थशास्त्रापेक्षा पर्यावरणशास्त्र आणि वनशास्त्राला महत्व आले आहे. चंद्रपूरच्या जनतेने वनांवर मनापासून प्रेम केले आहे. आयुष्याचा पहिला श्वास वनांसोबत आणि शेवटचा प्रवासही लाकडासोबतच होतो. त्यामुळे पर्यावरण राहिले तरच मनुष्यसृष्टी राहील आणि जटायु हा पर्यावरणाचा स्वच्छता दूत आहे, त्यामुळेच जटायु संवर्धनाचा संकल्प केला आहे. आज १० जटायु आहे, आता त्याची संख्या २० आणि पुढे ४० करण्यासाठी ज्यांच्या नावातच 'राम' आहे, अशा डॉ. रामगावकर यांच्यावर जटायू संवर्धनाची जास्त जबाबदारी आहे, असेही वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले. वनांसोबत आयुष्याचे एक नाते असते. वनांपासून वनांसाठी मनापासून काम करणा-यांना आता महाराष्ट्र भूषणच्या धर्तीवर वनभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. ताडोबा उत्सवामध्ये या पुरस्काराची घोषणा करण्यात येणार असल्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.चंद्रपूरकरीता आजचा दिवस अतिशय महत्वाचा असून अयोध्या येथे प्रभू रामाच्या प्राणप्रतिष्ठेपूर्वी ताडोबा व्याघ्र प्रकल्पामध्ये जटायुचे आगमन झाले आहे. जटायु पक्षामुळे निसर्गाची स्वच्छता होते. ताडोबा क्षेत्रातील गावे पुनर्वसित झाल्यामुळे येथे मनुष्यविरहीत जंगल आहे. त्यामुळे ताडोबा हे जटायुंचे चांगले अधिवास होईल. जटायु संवर्धन प्रकल्पासाठी राज्याचे वनमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विशेष पुढाकार घेतला. निसर्गाची श्रृंखला यामुळे पुर्नस्थापित होणार असल्यामुळे लुप्त झालेल्या जटायुचा पुनर्जन्म झाला असल्याचे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष प्रविणसिंह परदेशी यांनी सांगितले.प्रास्ताविकात क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर म्हणाले, जटायुचे निसर्गामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. ताडोबा जटायुसाठी सुरक्षित वनक्षेत्र आहे. प्रथम टप्प्यात १० जटायु संशोधकांच्या निरीक्षणाखाली ठेवल्यानंतर त्यांना निसर्गात सोडले जाईल. ताडोबातील जटायु संवर्धन अतिशय मोलाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला तन्मय बिडवई, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाचे प्रकाश धारणे, डॉ. मंगेश गुलवाडे, अरुण तिखे, ब्रिजभुषण पाझारे, विभागीय वन अधिकारी सचिन शिंदे, वन परिक्षेत्र अधिकारी रुंदन कातकर यांच्यासह गावकरी उपस्थित होते.जटायु (गिधाड) हा निसर्गातील सफाई कामगार म्हणून ओळखला जातो. गावाच्या वेशीवर टाकल्या जाणा-या मृत प्राण्यांना खाऊन गिधाड निसर्ग स्वच्छ ठेवत असे. भारतात जटायुच्या ९ प्रजाती आढळतात. सन १९९० मध्ये गिधाडांची संख्या चार कोटी होती पण, आता ती संख्या कमी होऊन केवळ ५० हजारांवर आली आहे. जटायु प्रजाती नष्ट होण्यास डाईक्लोफिनेक नावाचे रसायन कारणीभूत असल्याचे संशोधनाअंती सिध्द झाले आहे. पाळीव गुरांना देण्यात येत असलेल्या औषधामध्ये या रसायनाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात होता. मृत झालेल्या देहातून या रसायनाला बाहेर टाकण्यास खूप वेळ लागतो. जटायु या प्राण्यांचे भक्षण करतात. अशा प्रकारे डाईक्लोफिनेक रसायन जटायुंच्या शरीरात जाते आणि परिणामी जटायु मरण पावतात. जटायुची संख्या कमी होणे जैवविविधता व निसर्ग चक्रालाघातक आहे. अशा संकटग्रस्त जटायु पक्ष्याला या क्षेत्रात पुन-प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई यांच्या महत्वपूर्ण पुढाकाराने जटायु संवर्धन केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या पिंजोर (हरयाणा) येथील गिधाड प्रजनन व संशोधन केंद्रातून प्रथम टप्यात पांढ्या पाठीचे १० गिधाड पक्षी रीतसर शासनाची परवानगी घेऊन ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोळसा परिक्षेत्रातील बोटेझरी भागात तयार केलेल्या प्रिरीलीज अव्हीयारी मध्ये संशोधकांच्या देखरेखित ठेवण्यात आले आहे. साधारणत: ३ महिन्यानंतर त्यांना निसर्ग मुक्त करण्यात येणार आहेत.

# जिल्ह्यात २३ ते ३१ जानेवारी या कालावधीत मराठा समाज व खुल्या प्रवर्गाचे सर्व्हेक्षण

### घरी येणाऱ्या प्रगणकांना योग्य उत्तरे देऊन सहकार्य करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य शासन व महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या निर्देशानुसार मराठा समाज व खुल्या प्रवर्गाच्या सर्व्हेक्षणाचे काम २३ ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे.



सर्व्हेक्षणाच्या कामाकरीता चंद्रपूर जिल्ह्यात ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहायक, शिक्षक व इतर कर्मचारी असे एकूण ४००८ कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर कृषी अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, मंडळ अधिकारी व इतर असे एकूण २७० अधिका-यांची पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सर्व्हेक्षणाच्या अनुषंगाने आयोगाकडून नियुक्त पुणे येथील गोखले इन्स्टिटयूट येथील प्रशिक्षकांकडून २० जानेवारी रोजी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नोडल अधिकारी तसेच प्रत्येक तालुका प्रशिक्षकांना तसेच २१ व २२ जानेवारी रोजी तालुकास्तरावर सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात आले. घरोघरी येऊन सर्व्हेक्षणाचे कामकाज करणा-या प्रगणकांना आयोगाकडून ओळखपत्र देण्यात आले आहे. या सर्व्हेक्षणात जिल्ह्यातील सर्व कुटुंबाचे सर्व्हेक्षण करण्यात येणार असून मराठा व खुल्या प्रवर्गातील कुटुंबाकरीता प्रश्नावली निश्चित करण्यात आली आहे. सदर सर्व्हेक्षण हे मोबाईल पद्वारे होणार आहे. तरी प्रगणकाच्या घरभेटीवेळी कुटुंबातील सज्ञान सदस्याने घरी थांबून सर्व्हेक्षण करणा-यास सहकार्य करावे व विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे द्यावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी केले आहे. नोडल अधिका-यांची नियुक्ती : जिल्ह्यातील ग्रामीण भागातील व नगर परिषद / नगर पंचायत क्षेत्राकरीता जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हे जिल्हा नोडल अधिकारी म्हणून तर निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार हे सहायक जिल्हा नोडल अधिकारी आहेत. चंद्रपूर शहर महानगर पालिका क्षेत्राकरीता आयुक्त विपीन पालीवाल यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच आयोगाकडून तालुका स्तरावर तालुका नोडल अधिकारी म्हणून तहसीलदार आणि सहायक नोडल अधिकारी म्हणून नगर परिषद / पंचायतीचे मुख्याधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

# पुलगाव नगरीमध्ये सर्वत्र राम नामाचा गजर

**पुलगाव । प्रतिनिधी**

श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथे होत असलेल्या श्रीरामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने शहरामध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. जय श्रीराम!, हनुमान चालिसा, भजन, रामधून, श्रीरामाचा जयजयकार यामुळे संपुर्ण नगरी राममय झाली.



नदीकाठील वशिष्ठाश्रम येथील राम मंदिरात सकाळी ८ वाजता वाजता अभिषेक, राजोपचार पुजन,शृंगार,१० वाजता विविध द्रव्य वस्तुंनी सहस्त्रार्चन,११ ते १ प्राणप्रतिष्ठा महोत्सवाचे प्रसारण,, महाआरती,प्रसाद व रात्री सुंदरकांड पाठ असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.श्रीराम जन्म शोभायात्रा समितीने आवाहन केलेल्या वाहन रॅली मध्ये जोरदार नारे देत युवा शक्ती, महिला मोठ्या संख्येने संमिलीत झाले. हरिराम नगर येथील राम मंदिरात भजन, महाआरती व महाप्रसाद आयोजित करण्यात आला.हरिरामनगर येथील हनुमान मंदिर येथे सकाळी साडेअकरा वाजता हनुमान चालीसा पाठ करण्यात आला. तसेच त्रयोदष मंत्र श्रीराम जय राम जय जय राम चे पठण करण्यात आले. महाआरती व प्रसाद वितरण करण्यात आले. रात्री महाप्रसाद वितरित करण्यात आला. रामनगर येथील साई मंदिरामध्ये साई सेवादल पुलगाव च्या वतीने हनुमान चालीसा पाठ व महाआरती करण्यात आली. यानंतर रामनामच्या धुनमध्ये घरोघरी लाडू वाटप करण्यात आले. सेवा फाउंडेशन पुलगाव च्या वतीने हिंगणघाट फैल येथील हनुमान मंदिरामध्ये श्रीराम मूर्तीचा अभिषेक, महाआरती करण्यात आले. यानंतर नगरातील ११ प्रमुख ठिकाणी लाडू वितरण करण्यात आले. ५०१ एक किलो लाडू वितरणाचा संकल्प पूर्ण करण्यात आला. सायंकाळी सहा वाजता हनुमान चालीसा पठण सामूहिक रित्या करण्यात आले. यानंतर मोठ्या प्रमाणावर महाप्रसाद वितरित करण्यात आला. सर्कस ग्राउंड परिसरात असलेल्या दुर्गा माता मंदिराच्या वतीने रामलीला विराजमान झाल्यानंतर भव्य मिरवणूक काढण्यात आली. यात भजन, दिंड्या, पालखी, रामायण ग्रंथ, झांकी यांचा समावेश होता. तरुण रामायण मंडळ पुलगाव च्या वतीने स्थानीय टिळक चौक येथे सजावट करण्यात आली. रात्री सामुहिक सुंदर कांड पाठ चे आयोजन करण्यात आले.सुवर्णकार असोसिएशनच्या वतीने मोठ्या प्रमाणावर सजावट करण्यात आली.अल्पोहार वितरित करण्यात आला.गांधी चौकातील व्यापारी मित्रांनी तीन दिवसापासूनच ध्वज पताकांनी सजावट करण्यात आली. आज सडा सम्मार्जन करून रांगोळ्या काढण्यात आल्या. सर्वच ठिकाणी डी. जे. लाऊन रामगीते सुरु होती. शहरातील सर्व भागामध्ये श्रीरामाची प्रतिमा लाऊन, भगवे ध्वज लाऊन, पताका लाऊन, विद्युत रोषणाई करून, महाप्रसाद, फराळ स्टॉल लाऊन, रांगोळ्या काढून सुशोभित करण्यात आले होते. शहरातील सर्वच भागात उत्साह ओसंडून वाहत होता. त्यामुळे एकात्मतेचा अनुभव येत होता.

# श्री प्रभु रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठापना निमित्त यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने ११ प्रकारच्या भातांचे महाप्रसाद वितरण

### संस्कार टिव्ही फेम भजन सम्राट दिनेशजी शर्मा यांच्या भजन कार्यक्रमाने राममय वातावरण





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अयोध्या येथे पार पडलेल्या रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठापना निमित्त यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने महानगर पालिका पटांगणात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ११ प्रकारच्या भातांचा महाप्रसाद वितरित केला गेला. तर संस्कार टिव्ही फेम भजन सम्राट दिनेशजी शर्मा याच्या भजन कार्यक्रमाचे राममय वातावरण निर्माण झाले.

यावेळी आमदार किशोर जोरगेवार, माजी नगर सेवक बलराम डोडाणी, दामोदर सारडा, डॉ. सुशिल मुंधडा, शिव सारडा, सुरेश राठी, राजेश काकानी, राजु शास्त्रकार, संदिप भाटिया, यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे, महिला शहर प्रमूख वंदना हातगावकर, सविता दंडारे, सायली येरणे, नकुल वासमवार, विनोद अनंतवार, बबलू मेश्राम, आशा देशमूख, करणसिंग बैस, किशोर बोलमवार, हेरमन जोसेफ, कार्तीक बोरेवार, दुर्गा वैरागडे, वंदना हजारे, यांच्यासह यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.आज सोमवारी अयोध्या येथे पार पडलेल्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्या निमित्त संपूर्ण देशात विविध धार्मीक सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. चंद्रपूरातही आमदार किशोर जोरगेवार संस्थापक अध्यक्ष असलेल्या यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने महानगर पालिकेच्या पटांगणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ८.०० वाजता पासून या कार्यक्रमांना सुरवात झाली. यावेळी भव्य एलईडी स्क्रीनवर अयोध्या मंदिर प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. सकाळी ८.३० वाजता लखमापूर भजन मंडळाच्या वतीने सुंदरकांड करण्यात आले आहे. दुपारी १ वाजेपासून संस्कार टिव्ही फेम भजन सम्राट दिनेशजी शर्मा यांच्या भजन कार्यक्रमाला सुरवात झाली. यावेळी दिनेशजी शर्मा यांनी आपल्या भक्तीमय भजनाने धार्मीक वातावरण निर्माण केले. त्यांच्या भजन कार्यक्रम पाहण्यासाठी रामभक्त चंद्रपूरकरांनीही मोठी गर्दी केली होती. तर चंद्रपूर जिल्हा भात उत्पादक जिल्हा असल्याने ११ प्रकारच्या भातांचे महाप्रसादाचेही येथे वितरण करण्यात आले. यात गोड भात , मसाला भात , खट्टा भात , दही भात, गद्दा भात , गुळ भात, दाल खिचड़ी भात, मटर भात, पालक भात, टमाटर भात, मसूर भात आदी प्रकारच्या भातांचा समावेश होता. यावेळी हजारो नागरिकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. अयोध्या येथे रामलल्लाची आरती सुरु होताच आमदार किशोर जोरगेवार यांनीही कार्यक्रमाच्या आयोजित स्थळी रामलल्लाची आरती केली. या आरतीत शेकडो चंद्रपूरकर सहभागी झाले होते. यावेळी ११ प्रकारच्या भातांचा श्री प्रभू रामचंद्र यांना प्रसाद चढविण्यात आला. आजचा दिवस देशासाठी गौरवाचा आहे. इतिहासात या दिवसाची नोंद केली जाणार असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

# मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी २४ ते ३१ जानेवारी या कालावधीत घरोघरी सर्व्हेक्षण



**गडचिरोली । प्रतिनिधी**

मराठा समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यात २४ ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत घरोघरी सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. मराठा समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाकडून नव्याने इंपिरीयल डाटा गोळा करण्यात येणार आहे. त्यानुसार राज्य मागासवर्ग आयोगाने करावयाच्या सर्व्हेक्षणासाठी निकष निश्चित केले असून त्याबाबतची प्रश्नावली अंतिम केली आहे. या सर्व्हेक्षणाच्या कामासाठी व प्रश्नावलीच्या संबंधाने संबंधित तालुक्याचे तहसीलदार यांना नोडल अधिकारी म्हणून तर नायब तहसीलदार यांना सहायक नोडल अधिकारी व एका शासकीय कर्मचा-याची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेतलेल्या अधिकारी व कर्मचा-यांकडून सर्व्हेक्षणासाठी तालुक्यात नियुक्त करण्यात आलेले प्रगणक व पर्यवेक्षक यांना दोन दिवसीय प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने २४ जानेवारी २०२४ पासून प्रत्येक तालुक्यात प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाला सुरवात होणार आहे.सदर सर्व्हेक्षण विहित मुदतीत पूर्ण करावयाचे असल्याने २४ ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत सर्व्हेक्षणासाठी आपल्या घरी आलेल्या प्रगणकाने विचारलेल्या प्रश्नांची योग्य ती उत्तरे देऊन प्रगणकाला सहकार्य करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी सुनील सुर्यवंशी यांनी केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .